11 JUL 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : सिद्धगिरी मठातर्फे विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात गुरुपौर्णिमेनिमित्त झालेला कार्यक्रम.

# सिद्धगिरी मठातर्फे गुरुपौर्णिमा उत्सव

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठ, कणेरी येथील सिद्धगिरी मठातर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त उत्सव झाला. विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात गुरुंचे पूजन महिलांच्या हस्ते झाले.

योगगुरू दत्ता पाटील यांनी योगाचे महत्त्व, शरीरावर होणाऱ्या परिणामाबद्दल माहिती दिली. विविध आसनांची माहिती दिली. प्रात्यक्षिकेही करुन दाखविली. यानंतर योगगुरू श्री. पाटील, सूरज पाटील यांचा सत्कार करण्यात आला. मठाचे समन्वयक डॉ. संदीप पाटील यांनी संयोजन केले. जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शिवाजी मगदूम, सचिव डॉ. महादेव जोगदंडे, सदस्य डॉ. राजेश सातपुते, डॉ. दीपक पवार आदी उपस्थित होते. मठ, विद्यापीठातर्फे वर्षभर कोणतीही सुटी न घेता विनामूल्य योगवर्ग घेतले जातात. सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.